# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७१११


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/तपासणी/२०१६/3377

दिनांक :- 26 OCT 2016

प्रति,

प्राचार्य,
विनाअनुदानित अभियांत्रिकी पदवी,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राज्यातील व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या तपासणीबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-

१. २/एनजीसी/चौकशी व कार्यवाही/२०१६/२१५६ दिनांक १५ ऑक्टोंबर २०१६.

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/तपासणी/२०१५/२२७० दि. १० सप्टे २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सोई सुविधा आहे किंवा नाही यबाबतची तपासणी या कार्यालयाव्दारे करण्यात आलेली आहे. तपासणी अंती आढळलेल्या त्रृटी आपणास कारणे दाखवा नोटीस बजावुन त्रृटीची पुर्तता ३ महीन्यात करण्याबाबत आपणास कळविण्यात आलेले होते.

तेव्हा आपणास कळविण्यात आलेल्या त्रृटीची पुर्तता करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतचा पुराव्यासह अहवाल तसेच आपण तंत्रशिक्षण सचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर केलेले शपथपत्र या कार्यालयास दिनाक २७/१०/२०१६ पर्यंत सादर करावे. जर आपणाव्दारे त्रृटी पुर्तता केली नसल्यास आपल्या संस्थेविरुध्द योग्य कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी तसेच तसेच माहीती सादर करतांना खालीलप्रमाणे माहीती सुध्दा सादर करावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार शिक्षकीय पदे भरल्याबाबतची कागदपत्रे,

२. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती यांचेकडुन शिक्षकीय पदांचे बिंदुनामावली मंजुर करुन घेतल्याबाबतचे कागदपत्रे.

३. इमारत बांधकामांबाबतचे कागदपत्रे (त्रृटी कळविल्यानंतर पुर्ण केलेल्या बांधकामाबाबत लागु असल्यास)

४. यंत्रसामुग्री खरेदी केल्याबाबतचे कागदपत्रे (त्रृटी दर्शविण्यात आली असल्यास).

५. प्राचार्य आणि शिक्षकीय पदांवर नियुक्तीना विद्यापिठाच्या मान्यतांच्या प्रती.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.